# नारळावरील महत्वाच्या किडी

## १. गेंडयाभुंगा:—ऑरिक्टी सऱ्हायनोसीरस

या किडीचा प्रौढ भुंगा माडाच्या शेंडयामध्ये नवीन येणारा कोंब किंवा सुई पोखरून खातो. नवीन वाढणारी सुई कुरतडली गेल्यामुळे लागण झालेल्या माडाच्या झावळया त्रिकोणी आकारात कात्रीने कापल्यासारख्या दिसतात. लहान रोपांमध्ये सुई भुंग्याने खाऊन फस्त केल्यास अशा रोपांना नवीन सुई येत नाही. काही वेळेस न उमललेली पोयदेखील भुंगा  कुरतडून खातो. अशी पोय न उमलता वाळते. त्यामुळे याचा परीणाम माडाची वाढ व उत्पन्न यावर होतो. जुलै ते सप्टेंबर या महिन्यात या भुंग्याची तीव्रता जास्त आढळते.



प्रौढभुंगा





प्रादुर्भितमाड

**नियंत्रणाचे उपाय:**


- या भुंग्याची पैदास शेणखताच्या खड्डुयात होत असल्याने बागेजवळ शेणखताचे खड्डे असल्यास अशा खड्डुयात दर दोन महिन्यांनी १.५ टक्का क्लोरोपायरीफॉस भुकटी मिसळावी.
- उपद्रव झालेल्या माडांच्या नवीन सुई तूनतारेच्या हुकाने भुंगे बाहेर काढुन नष्ट करावेत. सुईत सुमारे २५ ग्रॅम १.५ टक्का क्लोरोपायरीफॉस भुकटी आणि बारीक वाळू यांचे १: १या प्रमाणत केलेल मिश्रण भरावे.
- नारळ बागेत ०.६०.६०.६ मीटर आकाराचे प्रति हेक्टरी १० खड्डे ठिकठिकाणी खोदावेत. त्यामध्ये शेणखत भरावे व या शेणखतात १.५ टक्का क्लोरोपायरीफॉस भुकटी मिसळावी. त्यामुळे या खड्डुयातील शेणखतात मादी भुंग्यांनी घातलेल्या अंडयातून बाहेर येणाऱ्या अळयांचा नाश होईल.

- बॅक्युलो विषाणूग्रस्त भुंगे ३० ते ३५ प्रति हेक्टरी या प्रमाणात बागेत सोडावेत.
- बागेची वेळोवेळी स्वच्छत ठेवावी.
- बागेमध्ये गेंडयाभुंग्याचा गंध सापळा लावावा.

२. **सोंडयाभुंगाः—रिनकोफोरसफेरुजिनीयस**

या किडीच्या अळया माडाच्या खोडातील मऊगाभा खातात व खोड आतून पोखरतात. तथापि अळया खोडाच्या आत असल्याने प्रादुर्भाव झाल्याचे बाहेरुन ओळखता येत नाही. खोडाच्या आतील मऊगाभा जास्त पोखरला गेल्यास कालांतराने माड कोलमडतो. प्रादुर्भाव झालेल्या माडाची पाने निस्तेज दिसतात व त्यांची वाढ खुंटते. सोंडया भुंग्याचा प्रादुर्भाव माडाच्या शेंडयाकडील भागावर झाल्यास वाढणारी सुई किंवा पानाचा कोंब निस्तेज दिसतो. कालांतराने सगळया झावळा सुकून माड

**प्रौढभुंगा**



**प्रौढभुंगा, अळी व कोष**



**प्रादुर्भितमाड**



दगावतो. प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बुंध्यावर छिद्रे दिसतात व त्यातून ताजा भुसा व तांबूस तपकिरी स्त्राव वाहताना दिसून येतो.

**नियंत्रणाचे उपायः**

- भुंग्याने पाडलेली छिद्रे बुजवून घ्यावीत.
- शक्य असतील तेवढया अळया कोयतीच्या सहाय्याने काढुन टाकाव्यात.
- झाडाला कोणत्याही प्रकारची जखम करु नये. झाल्यास त्याला बोर्डो पेस्ट लावावी.
- झावळया शक्यतो तोडू नये. आवश्यकता असेल तर देठापासून २ ते ३ फूट ठेवून तोडावी.
- बागेमध्ये सोंडया भुंग्याचा गंध सापळा लावावा.

३. चक्राकार पांढरी माशी:—ॲल्युरोडिकस रुजियोपरक्युलॅटस

सन २०१६ मध्ये रूगोज चक्राकार पांढरी माशीचा प्रादुर्भाव पोलाची (तामिळनाडू) व पलक्कड (केरळ) या राज्यात तसेच सध्या कोकणातही दिसून येत आहे. या किडीचा उगम मध्य व उत्तर अमेरिकेतील बेलिझ, मेक्सिको, ग्वाटेमाला येथे झाला असून २००९ मध्ये या किडीची प्रथम नोंद शोभिवंत वनस्पतीवर फ्लोरिडा येथे घेण्यात आली.

या किडीची पिल्ले आणि प्रौढ दोघेही पानाच्या खालील बाजूस रस शोषून घेतात. चक्राकार पांढरी माशी शरीरातून गोड चिकट स्त्राव सोडत असल्यामुळे त्याकडे असंख्य मुंग्या आकर्षित होतात व त्यामुळे स्त्राव सर्वत्र पानावर पसरतो. पानाच्या वरच्या बाजूवर गोड चिकट स्त्राव दिसून येतो आणि त्यावर काळया बुरशीची वाढ होते. त्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा निर्माण होतो. किडीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात झाला तर नारळ फळांवरसुध्दा 'चक्राकार आवरणात अंडी व प्रौढ दिसून येतात'.



प्रौढमाशी



प्रादुर्भितमाडीचीपाने

**नियंत्रणाचेउपाय:**

- या किडीचे नैसर्गिक शत्रू उदा. क्रायसोपा, ढालकिडा, मॅलाडा, इनकार्सिया, जावराव्ही या भुंगा, कातिन, लेइओचिनस इत्यादीचे बागेत संवर्धन करावे.
- ज्या क्षेत्रामध्ये इनकार्सिया परोपजीवी कीटक दिसून येतात अशा क्षेत्रातून ते गोळा करून प्रादुर्भावित बागेत सोडावे म्हणजे किडीचे जैविक व्यवस्थापन होईल.

- नारळाच्या झावळयांवर खालच्या बाजूने पाण्याचा फवारा करावा जेणे करून नैसर्गिक कीटक त्यावर उपजिविका करतील.
- या किडीच्या नियंत्रणासाठी ईमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल. ०.००५ टक्के (३ मिली/१० लिटर पाण्यात मिसळून) फवारणी करावी किंवा ०.५ टक्के निमतेल फवारावे.
- पानावरील काळया बुरशीच्या व्यवस्थापनासाठी १ टक्का स्टार्च सोल्युशन फवारावे.
- चक्राकार पांढरी माशी आकर्षित करण्यासाठी पिवळे चिकट सापळे माडांच्या शेंडयाकडे लावावे

**४. इरिआफाईड कोळी:—ॲसेरियाग्युरेरॉनिस**

**नुकसानीचा प्रकार—**

ही कीड नारळाच्या देठाखालील आवरणाच्या आत राहून त्या भागातील रस शोषून घेते. परिणामी देठाच्या खालच्या भागात पांढरट, पिवळे त्रिकोणी चट्टे दिसतात. नंतर हे चट्टे वाढत जाऊन त्यांचा आकार त्रिकोणी बनतो.प्रादुर्भित भागातील फळांची आवरण तडकते. परिणामी नारळ लहान राहतात. काथ्याची प्रत घटते. तसेच लहान फळांची गळ होते.

**नियंत्रणाचे उपाय—**

- या किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडुनिंबयुक्त (अझाडिरॅक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाव्दारे एप्रिल ते मे, ऑक्टोबर ते नोव्हेंबर व जानेवारी ते फेब्रुवारी या कालावधीत वर्षातून तीन वेळा द्यावे.
- नारळास ५० किलो कंपोस्ट, १० किलो निंबोळी पेंडव झिंक, बोरॉन, मॉलीब्डेनम व कॉपर ही अतिसूक्ष्म अन्नद्रव्ये २०० ग्रॅम प्रति झाड दरवर्षी द्यावीत.
- १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (१०,००० पी.पी.एम. अझाडिरॅक्टीन) ४ मि.ली. प्रति लीटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी.

५. काळया डोक्याची अळी:—ऑपिसीनाअरेनोसेला

नुकसानीचा प्रकार—

अळया पानाच्या खालच्या भागावर जाळी तयार करुन पानातील हरितद्रव्य खातात व त्यामुळे पाने करपल्यासारखी दिसतात.

नियंत्रणाचेउपाय—

- नियंत्रणासाठी १६ मि.ली. डायमेथोएट ३० टक्के प्रवाही किंवा १० मि.ली. डी. डी.व्ही.पी. ७६ टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- किडलेली पाने काढून त्यांचा नाश केल्यास किडीच्या प्रसारास अळा बसतो.
- जैविक नियंत्रणासाठी एका नारळाच्या झाडावर जर १२ अळया आढळून आल्या तर गोनिओझस नेफॅटिडीसहा या अळीचा परोपजीवी कीटक ३,५०० प्रौढ कीटक प्रती हेक्टर या प्रमाणात बागेत झावळयांवर सोडाव्यात.

६. उंदिर—रॅटसरॅटस, बॅडीकोटाबेंगालेन्सीस

नुकसानीचा प्रकार—

उंदीर कोवळी फळे पोखरतात व त्यामुळे फळांची गळ होते.

नियंत्रणाचे उपाय—

- माड स्वच्छ ठेवावेत.
- जमिनीपासून २ मीटर उंचीवर ४० से.मी. रुंदीचा गुळगुळीत पत्रा बुंध्याभोवती बसवावा.
- १ भाग झिंक फॉस्फाईड व ५० भाग गव्हाचे पीठ यापासून केलेल्या आमिषाच्या गोळया पानांच्या बेचक्यात एक महिन्याच्या अंतराने टाक्याव्यात.
- नवीन लागवड घट्ट न करता योग्य अंतरावर करावी. म्हणजे उंदीर एका माडावरुन दुसऱ्या माडावर जाऊ शकणार नाहीत.
- झाडांना स्पर्श करणाऱ्या इतर फांद्या छाटाव्यात जेणेकरुन उंदरांना झाडावर प्रवेश करता येणार नाही.